महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१००+ ग्रेड वेतन रु. ५४००) या संवर्गातील वैद्यकीय अधिका-यांच्या बदलीबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश, क्रमांकः मवैअ-२०१५/प्र.क्र. ११२३/सेवा-३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, १० वा मजला
मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: १५ जानेवारी, २०१६.

वाचा : आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/२अ/टे-३/पदस्थापना/७१३७/१५, दिनांक १७.१०.२०१५.

शासन आदेश :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० + ग्रेड वेतन रुपये ५४००) या संवर्गातील डॉ. संजय महादेवराव तोडासे, वैद्यकीय अधिकारी गट-अ, प्राथमिक आरोग्य केंद्र, कोळगांव, जि.यवतमाळ यांची विनंती बदली उप जिल्हा रुग्णालय, पांढरकवडा, जि.यवतमाळ येथे डॉ.ओम पाटील, वैद्यकीय अधिकारी हे अनधिकृतरित्या गैरहजर असल्याने त्यांच्या जागी करण्यात येत आहे. डॉ.ओम पाटील, वैद्यकीय अधिकारी यांच्या नियुक्तीबाबतचा प्रस्ताव संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांनी शासनास सादर करावा व त्यानुसार त्यांच्या नियुक्तीचे आदेश स्वतंत्रपणे काढण्यात येतील.

संबंधितांनी डॉ. संजय महादेवराव तोडासे, वैद्यकीय अधिकारी यांना बदलीच्या ठिकाणी तात्काळ रुजू करुन घ्यावे, तसेच डॉ. संजय महादेवराव तोडासे, वैद्यकीय अधिकारी यांनी रुजू अहवाल संबंधितना व शासनास सादर करावा.

सदर आदेश महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) आणि ४(५) च्या तरतुदीनुसार निर्गमीत करण्यात येत आहेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११५१७१३०४३९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaskar Baburao Patil

Digitally signed by Bhaskar Baburao Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Bhaskar Baburao Patil
Date: 2016.01.15 18:13:23 +05'30'

(भा. बा. पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
२) उप संचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ अकोला
३) जिल्हा शल्यचिकित्सक, यवतमाळ
४) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञयेता) मुंबई/नागपूर
५) जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ
६) वैद्यकीय अधिक्षक, यवतमाळ.
७) संबंधित वैद्यकीय अधिकारी (उप संचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ यांच्यामार्फत)
८) निवड नस्ती सेवा-३